**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या मालकीची निर्लेखित शासकीय वाहनांचा जाहिर लिलाव करण्याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे :**

१) वाहन क्र. एम.एच-०१-एजी-९०९ (टाटा इंडिगो), वाहनक्र.एम.एच-०१ झेडए-१९६३ (टाटा इंडिगो) वाहन क्र. एम.एच-०१ ए.एन.-५४५४ (इनोव्हो), वाहन क्र. एल.-५९३५ (मिनी बस) व वाहन क्र. एम.एच-०१ ए.जी.-२७२७ (अॅम्बेसेडर) एम.एच- ०१झेड.ए-१०१०(होंडा सिटी) एम.एच-०१ ए.एन-९९९ (फिएट लिनिया) ही वाहने"जशी आहेत तशा स्थितीत" लिलावाद्वारे विक्रीकरिता ठेवण्यात आली आहेत. दिनांक ०५ ते ०८ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी २:०० ते सायंकाळी ५:३० या कालावधीत विधान भवन, मुंबई येथील तळघरात सदरहू वाहने पाहण्यासाठी उपलब्ध असून या वाहनांच्या पाहणीकरिता कक्ष अधिकारी व मालमत्ता व्यवस्थापक कक्ष क्र.०१७ तळमजला विधानभवन मुंबई यांचेकडे संपर्क करण्यात यावा.

२) **दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. निर्लेखित वाहनांची लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल.**

३) प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्ररित्या लिलाव बोली करावी लागेल.

४) सदर वाहनाचा लिलाव करण्याकरिता मे.पहिया सर्व्हिस प्रा. लि. यांची लिलवादार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत सदर लिलावाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

५) लिलाव बोलीमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांना रोख रुपये ५,०००/- इतकी रक्कम प्रवेश फी म्हणून **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय"** यांचेकडे **दिनांक १९ व २० सप्टेंबर, २०२२ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत** जमा करावी लागेल. सदहू रक्कम ही ना परतावा स्वरूपाची राहील. प्रवेश फी भरलेल्या बोलीदारांनाच लिलावामध्ये भाग घेता येईल. तसेच रक्कम भरल्याची पावती तपासूनच लिलावाचे दिवशी विधान भवन येथे प्रवेश देण्यात येईल.

..२/-

६) लिलाव बोलीमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेस सर्व वाहनापोटी रुपये १०,०००/- इतकी रक्कम बयाणा म्हणून मे.पहिया सर्व्हिस प्रा. लि. यांचेकडे **दिनांक २१ व २० सप्टेंबर, २०२२ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत** भरावी लागेल त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

**(1)UPIID-PAHIYA.06@cmsidfc**

**(2) IDFC BANK A/C No.10033380319,**

**IFSC-IDFB0041353(CampBranch-Pune)**

सदर रक्कम भरल्यानंतर यशस्वी बोलीदार व्यक्तीने/संस्थने वाहन घेवून जाण्याबाबतची पुढील कार्यवाही पूर्ण न केल्यास बयाणा रक्कम जप्त करुन ती शासन जमा करण्यात येईल. अयशस्वी बोलीदारांना त्यांची बयाणा रक्कम मे.पहिया सर्व्हिस प्रा. लि. यांचे मार्फत परत करण्यात येईल.

७) लिलावातील प्रत्येक वाहनांसाठी शासनाने विहीत केलेल्या कराची रक्कम वाहन खरेदी करणाऱ्या व्यक्तीस **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय"** यांचे नावे भरणा करावी लागेल.

८) प्रत्यक्ष लिलावाच्यावेळी बोलीदारास छायाचित्र असलेले ओळखपत्र (आधारकार्ड/पॅनकार्ड) दर्शविल्यानंतरच प्रवेश देण्यात येईल.

९) यशस्वी लिलाव बोलीदारास वाहनांच्या खरेदीच्या रकमेच्या २५ टक्के इतकी रक्कम लिलावाचे दिवशी इसारा रक्कम म्हणून **"कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय"** यांचेकडे रोखीने भरावी लागेल. लिलावाच्या दिनांकापासून ३ दिवसांचे आत उर्वरित रक्कम भरुन संबंधित वाहन उचलले नाही तर संबंधित लिलाव बोलीदाराचे नाव रद्द करण्यात येईल व त्यांनी भरलेली अनामत रक्कम रुपये १०,०००/- व इसारा रक्कम (वाहनाच्या खरेदीच्या रकमेच्या २५% इतकी रक्कम) या दोन्ही रक्कमा जप्त करण्यात येऊन त्या शासन जमा करण्यात येतील. तसेच वाहन उचलण्यास विलंब केल्यास प्रतिदिनी रुपये ५००/- याप्रमाणे त्यांचेवर दंड आकारणी करण्यात येईल.

..३/-

१०) वाहन खरेदी नंतर त्यांच्या हस्तांतराबाबतची सर्व संबंधित कार्यवाही वाहन खरेदीदाराने स्वखर्चाने करावयाची आहे. लिलावाकरिता वाहनांची संख्या वाढविण्याचा अथवा कमी करण्याचा अधिकार **प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** यांनी राखून ठेवला आहे.

११) वाहन विक्रीच्या संदर्भात वरील अटी व शर्तीमध्ये वाढ करण्याचे किंवा त्या शिथील करण्याचे अधिकार **प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** हे राखून ठेवत आहेत.

१२) वाहन लिलावाच्या संदर्भातील सर्व कार्यवाही **मा.पीठासीन अधिकारी, यांचे निदेशानुसार करण्यात येत असल्याने वाहनांच्या लिलाव प्रक्रियेच्या संदर्भात काही वाद(Dispute) निर्माण झाल्यास प्रधान सचिव,म.वि.स. यांचा निर्णय अंतिम राहील.**